वनसंपत्तीचे सर्वेक्षण या योजनेत्तर योजनेच्या ६३ अस्थाई पदांना सन २०१८-१९ मध्ये मुदतवाढ देण्याचा चालू बाब प्रस्ताव.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक:-टिआरएस-०३/२०१८/प्र.क्र.१००/फ-६
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक:- २६ मार्च, २०१८

वाचा:- १) शासन निर्णय क्रमांक, असंक-१००४/प्र.क्र.१२ (भाग-२)/२००४/वित्तीय सुधारणा-१, दिनांक ४.१०.२००४

२) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क., दिनांक ५.३.२०१८

३) शासन निर्णय क्रमांक, महसूल व वन विभाग, एफडीएम-२०१७/प्र.क्र.२१ /फ-२, दिनांक १८.१.२०१८.

४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष- ३/योजनेतर/प्र.क्र.१५/(१७-१८)/२१८०, दिनांक २२.२.२०१८

शासन निर्णय :-

"वनसंपत्तीचे सर्वेक्षण" या योजनेतर योजनेतील ६३ पदांना सन २०१७-१८ मध्ये दिनांक १.१.२०१८ ते दिनांक २८.२.२०१८ पर्यंत चालू ठेवण्यास संदर्भ क्र.३ येथील दिनांक १८.१.२०१८ च्या शासन निर्णयान्वये शासनाची मंजूरी देण्यात आली होती. सदर पदांची मुदत दिनांक २८.२.२०१८ रोजी संपुष्टात आली आहे. खाली दर्शविलेली ६३ अस्थायी पदे ही वनविभागाच्या २५०२५ या मंजूर आकृतीबंधात समाविष्ट असल्याने या ६३ अस्थायी पदांना संदर्भ क्र.४ येथील पत्रान्वये प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने दिनांक १.३.२०१८ ते दिनांक ३०.९.२०१८ पर्यंत चालू ठेवण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अ. क्र.	पदनाम	पदसंख्या			
		अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कार्य आयोजना वृत्त, पुणे	अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कार्य आयोजना वृत्त, नागपूर	अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन्यजीव) पुर्व, नागपूर	एकूण
१	विभागीय वन अधिकारी	-	२	-	२
२	उपविभागीय वन अधिकारी	१	-	-	१
३	वनक्षेत्रपाल	२	-	-	२
४	वनपाल	१२	२४	-	३६
५	वनसर्व्हेक्षक	५	४	१	१०
६	लिपीक-टंकलेखक	१	१	-	२
७	वनरक्षक	२	४	-	६
८	वाहन चालक	१	१	-	२
९	शिपाई	१	१	-	२
	एकूण	**२५**	**३७**	**१**	**६३**

२. या पदांवर होणारा खर्च हा प्रधान शिर्ष २४०६ वनीकरण व वन्यजीवन (योजनेतर), १०१ वनसंधारण विकास व पुनर्निर्मिती, ०४ कार्य आयोजनामध्ये सुधारणा व तयारी (०४) (०१) कार्य आयोजनामध्ये सुधारणा व तयारी (२४०६ ०१४९) ०१ वेतन या लेखाशीर्षाखाली दर्शविण्यात यावा व सन २०१८-१९ मध्ये त्याखालील मंजूर होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा. सदर कालावधी मध्ये त्यांच्या आस्थापनेवरील मंजुर पदांचा आढावा घेवून सुधारीत आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. या नंतर सुधारीत आकृतीबंध निश्चीत करण्याकरीता कालावधी वाढवून देण्यात येणार नाही.

३. प्रस्तुत शासन निर्णय हा वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. शासन निर्णय, वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दिनांक ५.३.२०१८ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२७१५२६१३७८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Sujay Dodal

Digitally signed by Sujay Dodal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, cn=Sujay Dodal
Date: 2018.03.27 15:27:08 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रत :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर)
२) अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व)/मुख्य वनसंरक्षक (सर्व)
३) वनसंरक्षक कार्य आयोजना वृत्त नागपूर/ पुणे
४) मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक (सर्व) (प्रादेशिक)
५) मुख्य वनसांख्यिकी, प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे कार्यालय, नागपूर
६) वनसांख्यिकी, महाराष्ट्र राज्य, नागपूर
७) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
८) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/अमरावती/गडचिरोली/चंद्रपूर
९) वित्त विभाग, व्यय- १०/वित्तीय सुधारणा, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१०) ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११) निवडनस्ती, फ-६ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२